# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४.

## जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा मार्च–एप्रिल २०२२ चा निकाल दि. १७ जून, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणार आहे. सदर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) **परीक्षेस** पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत **व** तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे ) Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इ.१०वी साठी **<u>www.mahahsscboard.in</u>** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | **माध्यमिक शाळांमार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ट न झालेले), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे, ITI (औघेगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा** | **माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा** | **माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख** |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार, दिनांक २०/०६/२०२२ ते सोमवार, दिनांक २७/०६/२०२२ | मंगळवार, दिनांक २८/०६/२०२२ ते बुधवार, दिनांक २९/०६/२०२२ | गुरुवार दिनांक ३०/०६/२०२२ |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फतच भरावी. सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे..

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरताना मार्च–एप्रिल २०२२ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेनदनत्रात ऑनलाईन घेता येईल.

२. उपरोक्त परीक्षेस प्रथमत: प्रविष्ट झालेल्या व श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै–ऑगस्ट २०२२ व मार्च २०२३ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३. नियमित शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाव्दारेच भरण्यात यावे.

४. सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलीत शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बॅंकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५. आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

दिनांक – १७/०६/२०२२
१८

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.